राज्यातील वित्तीय सहकारी संस्थांचे
लेखापरीक्षण अहवाल छाननी
कामकाजाबाबत.....

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**

जा.क्र.सआ/लेखापरीक्षण/परिपत्रक/छाननी कक्ष/ १३६३ /२०१८, दिनांक 23 /१०/२०१८

## : परिपत्रक :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८१ अन्वये, **संस्था** प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपले लेख्यांची लेखापरीक्षा करवील, अशी तरतुद आहे. तदनुषंगाने संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे चालू आर्थिक वर्षासाठी नामतालिकेमधील सनदी लेखापाल, सनदी लेखापालांच्या फर्मस, कॉस्ट अकौंटंट, कॉस्ट अकौंटंटच्या फर्मस, प्रमाणीत लेखापरीक्षक व शासकीय लेखापरीक्षक यांचे मधुन अर्हताधारक लेखापरीक्षकाची नेमणूक वैधानिक लेखापरीक्षणास्तव करणेत येते. अधिनियमातील सदरहू तरतुद पाहता, सुधारित अधिनियमान्वये लेखापरीक्षकाच्या नियुक्तीची स्वायत्तता संस्थेस प्रदान करणेत आलेली आहे.

संस्थेची आर्थिक व सांपत्तिक स्थिती निदर्शनास येणेसाठी, संस्थेच्या कामकाजातील अनियमितता व गंभीर बाबी वेळीच निष्पन्न होणेसाठी, संस्था अधिनियम, नियम व पोटनियमान्वये यथोचितरित्या कामकाज पार पाडत असल्याचे निदर्शनास येणेसाठी व संस्थांच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा होणेसाठी वैधानिक लेखापरीक्षणास अनन्यसाधारण महत्व आहे. संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग व लेखापरीक्षकाचे लेखापरीक्षण अहवालातील अभिप्राय यावर संस्थेची विश्वासार्हता अवलंबुन असते. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये लगतच्या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभासदांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येतो, ही बाब देखील अधिनियमान्वये अनिवार्य आहे. ज्यामुळे लेखापरीक्षणाचे व लेखापरीक्षण अहवालाचे महत्व स्पष्ट होते.

सुधारित अधिनियमान्वये लेखापरीक्षक नेमणूकीची स्वायत्तता संबंधीत संस्थांना प्रदान केल्याने, संस्थांमार्फत सातत्याने नामतालिकेवरील सनदी लेखापाल व प्रमाणीत लेखापरीक्षकांच्या नेमणूका नियमीत वार्षिक लेखापरीक्षणास्तव केल्या जात आहेत. संस्थांना स्वायतत्ता दिल्याने सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणामध्ये आवश्यक ती गुणवत्ता न राहिल्याने अनेक संस्था आर्थिक संकटात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. वित्तीय संस्थांची आर्थिक पत टिकून राहणेसाठी संस्थेचे व्यवस्थापन, लेखापरीक्षक व लेखापरीक्षण अहवालाची सभासदांमधील साशंकता कमी करणेसाठी या संस्थांवर व लेखापरीक्षकांवर प्रभावी नियंत्रण व पर्यवेक्षण राखणे आवश्यक असल्याने प्राप्त होणाऱ्या लेखापरीक्षण अहवालांची छाननी होणे आवश्यक झालेले आहे.

त्याअनुषंगाने सहकारी संस्था व लेखापरीक्षक यांनी केलेल्या लेखापरीक्षण कामकाजाकडे नियंत्रणाच्या दृष्टीने गांभीर्याने विचार करणे आवश्यक झाले आहे. यास्तव राज्यातील वित्तीय सहकारी संस्थांचे प्रत्येक वर्षी प्राप्त होणाऱ्या लेखापरीक्षण अहवालांची छाननी होऊन प्राप्त होणाऱ्या छाननी अहवालानुसार संबंधित संस्था व लेखापरीक्षक यांना आवश्यक त्या सुचना व लेखापरीक्षण कामकाज गुणात्मकदृष्ट्या झालेले नसल्यास चाचणी लेखापरीक्षण आदेश पारीत करुन संबंधित संस्था व लेखापरीक्षकांविरुद्ध पुढील कारवाई करणे आवश्यक झालेले आहे.

Scanned by CamScanner

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता राज्यातील वित्तीय सहकारी संस्थांचे प्रत्येक वर्षी लेखापरीक्षण अहवाल छाननी होण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा विशेष लेखापरीक्षक कार्यालयाचे स्तरावर लेखापरीक्षण अहवालांची छाननी करणे आवश्यक झाले आहे.

राज्यातील वित्तीय सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननीसाठी जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१ यांचे कार्यालयाने खालीलप्रमाणे नियोजन करावे.

१. जिल्ह्यातील उपलब्ध लेखापरीक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन वित्तीय संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननी कामकाज प्रत्येक वर्षी करुन घ्यावयाचे आहे.

२. राज्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, नागरी/ग्रामिण बिगर शेती / पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या वित्तीय संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननी कामकाज करावयाचे आहे.

३. वित्तीय संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननी कामकाज संस्थेच्या कार्यक्षेत्रनिहाय करावे. ज्या संस्थांचे कार्यक्षेत्र तालुकास्तर आहे अशा संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननी तालुका लेखापरीक्षकामार्फत करुन घ्यावयाचे आहे. तसेच ज्या संस्थांचे कार्यक्षेत्र जिल्हास्तरीय आहे त्या संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननी कामकाज जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी त्यांचे जिल्ह्यातील विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ व वर्ग २ अधिकाऱ्यांकडुन करुन घ्यावयाचे आहे. प्राप्त होणारे छाननी अहवाल संबंधित संस्थेच्या निबंधकाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

४. राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे, त्या जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने स्वत: तसेच त्यांचे जिल्ह्यातील विशेष लेखापरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडुन संबंधित वित्तीय संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल छाननी कामकाज करावयाचे आहे. विभागस्तरीय संस्थांचे छाननी अहवाल संबंधित विभागीय सहनिबंधक (प्रशासन) व राज्यस्तरीय संस्थांचे छाननी अहवाल सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करावयाचे आहे.

५. सर्वसाधारणपणे त्या-त्या वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर लगेच लेखापरीक्षण अहवाल छाननी कामकाज सुरु करुन अंतिमत: माहे १५ ऑक्टोबर पर्यंत सर्व वित्तीय संस्थांचे छाननी अहवाल संबंधित निबंधकाला सादर करावयाचे आहे.जेणेकरुन त्यानंतर निबंधकास पुढील कार्यवाही करण्याच्या उद्देशाने चाचणी लेखापरीक्षण व तत्सम आदेश पारीत करणे शक्य होईल.

६. लेखापरीक्षण अहवालाची छाननी करतांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मधील सुचनांचे काटेकोटपणे पालन करावे.

23/10/18

(सतिश सोनी)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

<u>प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव -</u>

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन, लेखापरीक्षण) सर्व
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

Scanned by CamScanner

५. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) मुंबई.
६. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५
८. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
१०. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन मुंबई.
११. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. अपर निबंधक (आदिवासी विकास), सहकारी संस्था, नाशिक.
१७.मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.

Scanned by CamScanner

## परिशिष्ट अ

| अ.क्र. | लेखापरीक्षण अहवाल छाननी करतांना विचारात घ्यावयाच्या सुचना |
|---|---|
| १ | छाननी अहवालात संस्थेचे नाव, कार्यक्षेत्र, लेखापरीक्षण वर्ष व कालावधी, मुळ लेखापरीक्षकाचे नाव व पॅनल क्रमांक, लेखापरीक्षण वर्ग, अहवाल छाननी करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम नमुद करावे. |
| २ | लेखापरीक्षण अहवालाची रचना मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक.एडीटी/एच-१/लेपअ/रचना/सन २०१७ दि.१९/५/२०१७ नुसार केली आहे किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात अभिप्राय द्यावेत. |
| ३ | लेखापरीक्षण अहवालासोबत सादर करावयाची नमुना क्र.१ प्रश्नावली व संस्थानिहाय असणारी प्रश्नावली पुर्णपणे व अचूकपणे भरलेली आहे किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात अभिप्राय द्यावेत |
| ४ | अधिनियमातील कलम ८१(१)(इ) मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षकाचे अहवालात लेखापरीक्षणात निदर्शनास आलेले दोष किंवा अनियमितता यांचा तपशिल, आर्थिक अनियमितता व निधीचा दुरुपयोग, अपहार किंवा लबाडी याबाबतची कार्यपद्धती, इ.बाबी लेखापरीक्षण अहवालात नमुद केल्या आहेत किंवा नाही? याबाबत अभिप्राय द्यावेत. तसेच नफा-तोटा यावरील तद्नुरुप परिणामांसह लेखापरीक्षण अहवालात संस्थेच्या लेख्यामध्ये अनियमितता तसेच वित्तीय विवरणपत्रावर परिणाम करणाऱ्या बाबींचे तपशिलवार विवेचन केले आहे किंवा कसे? याबाबतही अभिप्राय द्यावेत. संस्थेचे समिती व उपसमित्या यांच्या कामकाजाची तपासणी करुन संबंधित लेखापरीक्षकाने अनियमितता व उल्लंघन झालेल्या बाबींबाबत यथोचितरित्या जबाबदारी निश्चित केली किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात अभिप्राय द्यावेत |
| ५ | अधिनियमातील कलम ८१ (२) मधील १ ते ९ मुद्यांना अनुसरुन लेखापरीक्षकाने आपले अभिप्राय यथोचितरित्या नमुद केले आहे किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात यथोचितरित्या अभिप्राय द्यावेत |
| ६ | लेखापरीक्षकास लेखापरीक्षणाच्यावेळी अपहार, गैरव्यवहार निदर्शनास आलेले असल्यास अधिनियमातील कलम ८१ (५ब) अन्वये विनिर्दिष्ट अहवाल तसेच आर्थिक अनियमितता निदर्शनास आली असल्यास विशेष अहवाल सादर केला किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात अभिप्राय द्यावेत. |
| ७ | लेखापरीक्षकाने अधिनियमातील कलम ८१ व नियम १९६१ खालील नियम ६९ (३) नुसार द्यावयाचा एन -२ नमुन्यातील लेखापरीक्षण दाखला योग्य पद्धतीने व सुस्पष्ट अभिप्रायासह दिला किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात अभिप्राय द्यावेत. |
| ८ | संस्थेचे लेखापरीक्षकाची केलेली नियुक्ती व लेखापरीक्षकाने दिलेली संमती नियम ६९ मधील तरतुदीनुसार आहे किंवा कसे? याबाबत छाननी अहवालात अभिप्राय द्यावेत. |
| ९ | सहकारी अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार लेखापरीक्षण विहीत मुदतीत पुर्ण करुन लेखापरीक्षण अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस निर्गमनापुर्वी संबंधीत लेखापरीक्षकाने संस्थेस व निबंधकास दिलेला आहे किंवा कसे? याबाबत अभिप्राय द्यावेत. |
| १० | शासन धोरण, शासन निर्णय, शासन परिपत्रकीय सुचना व आदेश तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सुचना/आदेश व निर्देशांचे पालनाबाबत लेखापरीक्षण अहवालात आवश्यक त्या ठिकाणी नोंद घेण्यात आलेली आहे किंवा कसे? याबाबत अभिप्राय द्यावेत. |
| ११ | लेखापरीक्षण अहवाल छाननीनंतर, संबंधित लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण करतांना त्याने लेखापरीक्षक म्हणून करावयाच्या कर्तव्यात काही कसूर केली असल्यास त्याबाबत स्वतंत्रपणे स्वयंस्पष्ट अभिप्राय छाननी अहवालात नमुद करावेत, तसेच लेखापरीक्षण अहवालातील नमुद तपशीलानुसार संस्थेविरुध्द काही कार्यवाही करणे आवश्यक आहे असे वाटल्यास त्याबाबत स्वतंत्रपणे स्वयंस्पष्ट अभिप्राय छाननी अहवालात नमुद करावेत. |
| १२ | लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेल्या लेखापरीक्षण वर्गवारीच्या गुणतक्त्यानुसार लेखापरीक्षकाने दिलेले गुण अचुकरित्या दिलेले आहेत किंवा कसे? तसेच संस्थेस प्रदान करण्यात आलेली लेखापरीक्षण वर्गवारी योग्य आहे किंवा कसे याबाबत छाननी अहवलात अभिप्राय नमुद करावे. |
| १३ | नागरी बँकाचे लेखापरीक्षण अहवाल छाननी करताना रिझर्व बँकेचे परिपत्रकिय सुचनांचे अवलोकन करुन त्याबाबींचे उल्लंघन झालेले असल्यास तसे अभिप्राय द्यावेत. त्याच प्रमाणे अहवालासोबत जोडलेल्या एन.पी.ए. तक्त्याची पडताळणी करुन लेखापरीक्षकाने त्यासंदर्भाने नमुद केलेली त्यांची निरिक्षणे यथोचित आहेत किंवा कसे? याबाबत अभिप्राय द्यावेत. |

Scanned by CamScanner